नवनिर्मित चंदगड, हातकणंगले व ढाणकी या ३ नगरपंचायतींच्या अध्यक्ष/सदस्य पदांच्या सार्वत्रिक व गडहिंग्लज नगर परिषदेच्या हद्दवाढ क्षेत्राची तसेच अन्य नगरपरिषदा / नगरपंचायतींमधील रिक्त अध्यक्ष/सदस्य पदांच्या पोटनिवडणुकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम - २०१९

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.६/का.६

**निवडणूक प्राथम्य**
**ई-मेल**

नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २९/११/२०१९.

प्रति,

जिल्हाधिकारी,
रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, जळगाव, नंदुरबार, उस्मानाबाद, अमरावती, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, चंद्रपूर व गडचिरोली. (१७ जिल्हे)

**विषय :-** **नवनिर्मित चंदगड, हातकणंगले व ढाणकी या ३ नगरपंचायतींच्या अध्यक्ष व सदस्य पदांच्या सार्वत्रिक व गडहिंग्लज नगर परिषदेच्या हद्दवाढ क्षेत्राची तसेच अन्य नगर परिषदा/नगरपंचायतींमधील रिक्त अध्यक्ष/सदस्य पदांच्या पोट निवडणुकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम-२०१९.**

**संदर्भ :-** १) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१८/प्र.क्र.९/का-६,दि.०७/०५/२०१९ व दि.२२/०७/२०१९ चे आदेश.
२) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.६/का-६, दि.०७/११/२०१९ चे आदेश.
३) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.११/का-६, दि.०७/११/२०१९ चे आदेश.
४) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१६.
५) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१७.

महोदय/महोदया,

सोबतच्या परिशिष्ट-२ मधील नमूद नवनिर्मित **चंदगड, हातकणंगले** व **ढाणकी** या ३ नगरपंचायतींच्या अध्यक्ष/सदस्य पदांच्या सार्वत्रिक व **गडहिंग्लज** नगरपरिषदेच्या हद्दवाढ क्षेत्राच्या निवडणुकांकरिता प्रभाग रचना, आरक्षण व सोडत शासन राजपत्रात अंतिमरित्या प्रसिध्द झालेली असून या ३ नगर पंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका व **गडहिंग्लज** नगर परिषदेच्या हद्दवाढ क्षेत्राची तसेच अन्य नगर परिषदा / नगरपंचायतींमधील रिक्त २१ सदस्य पदांच्या व रत्नागिरी, **सावंतवाडी, धरणगाव** व **मोर्शी** या ४ नगरपरिषदांमधील रिक्त अध्यक्ष पदांच्या पोट निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम देण्यात आला

होता. त्यानुसार अंतिम प्रभाग निहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करुन दिनांक २५/११/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

२. त्यानंतर आयोगाकडून संदर्भाधीन अ.क्र. १ येथील आदेशांन्वये **परिशिष्ट-२** मधील नवनिर्मित **चंदगड, हातकणंगले व ढाणकी या ३** नगरपंचायतींच्या अध्यक्ष व सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्याकरिता पूर्वतयारीबाबत सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत.

३. राज्य शासनाने संदर्भाधीन अ.क्र. ४ येथील अध्यादेश प्रख्यापित केला असून त्यानुसार "महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१६ (सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक १६ )", दि.३०/०८/२०१६ अन्वये नगर परिषदांच्या नगराध्यक्षांची निवड थेट जनतेमधून करण्याची पध्दती लागू केली आहे. तसेच दि.०४/१०/२०१६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे अध्यक्ष पदाचे निवडणूक नियम, २०१६ शासन राजपत्रात प्रसिध्द केले असून निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नगर परिषदेच्या अध्यक्ष पदाच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्राप्त होणाऱ्या नामनिर्देशनपत्रावर कार्यवाही करावी.

४. राज्य शासनाने संदर्भाधीन अ.क्र. ५ येथील अध्यादेश प्रख्यापित केला असून त्यानुसार "महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१७ (सन २०१७ चा अध्यादेश क्रमांक २५)" दिनांक ०२/११/२०१७ अन्वये नगरपंचायतींमधील नगराध्यक्षांची निवड थेट जनतेमधून करण्याची पध्दती लागू केली आहे. तसेच दि.१३/११/२०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे अध्यक्ष पदाचे निवडणूक नियम, २०१७ शासन राजपत्रात प्रसिध्द केले असून निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नगर पंचायतीच्या अध्यक्ष पदाच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्राप्त होणाऱ्या नामनिर्देशनपत्रावर कार्यवाही करावी.

५. राखीव जागेवर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तथापि, जातवैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्यांनी पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची पोचपावती नामनिर्देशन पत्रासोबत सादर करण्याची त्यांना मुभा देण्यात आली आहे. शासनाने सन २०१९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. २० अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ९ अ व ५१-१ब मध्ये केलेली सुधारणा जी दिनांक २२ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या राजपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्यानुसार अशा उमेदवारांनी निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून बारा महिन्याच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास

त्यांची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. या संदर्भात उमेदवाराकडून नामनिर्देशनपत्रासोबत विहित केलेले याबाबतचे हमीपत्र घेण्यात यावे. (अध्यादेशाची प्रत सोबत जोडली आहे.)

६. आता, या पत्रान्वये नवनिर्मित **चंदगड, हातकणंगले** व **ढाणकी या ३ नगरपंचायतींच्या** अध्यक्ष व सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता व **गडहिंग्लज** नगरपरिषदेच्या हद्दवाढ क्षेत्राची व **रत्नागिरी, सावंतवाडी, धरणगाव व मोर्शी** या ४ नगरपरिषदांमधील रिक्त अध्यक्ष पदांच्या पोट निवडणुकांकरिता तसेच अन्य नगरपरिषदा/नगरपंचायतींमधील रिक्त सदस्य पदांच्या पोट निवडणुकांकरिता प्रत्यक्ष निवडणुकीचा कार्यक्रम **परिशिष्ट-१** प्रमाणे जाहीर करण्यात येत आहे. सार्वत्रिक/पोट निवडणुका असलेल्या नगर परिषदा / नगर पंचयातींचा तपशील **परिशिष्ट-२** व ३ नुसार आहे.

७. **भडगाव नगरपरिषदेमधील रिक्त सदस्य पदाबाबत** मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रिट याचिका क्रमांक १४२५६/२०१९ मधील दि.२६/११/२०१९ रोजीचे निदेश विचारात घेता, भडगाव नगर परिषदेचा मुदत समाप्तीचा दिनांक २९/०४/२०२०, प्रभाग क्रमांक ३-ड (सर्वसाधारण महिला) मधील पद रिक्त झाल्याचा दिनांक २४/०४/२०१९ व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम ४८(१) मधील तरतूद ध्यानी घेता या रिक्त पदाची पोट निवडणूक घेणे आवश्यक असल्याचे आयोगाचे मत आहे.

८. निवडणुकीची आचारसंहिता आजपासून लागू झाली असून ती निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील. वरील आचारसंहिता सार्वत्रिक निवडणूक असलेल्या संपूर्ण संबंधित नगर पंचायतीच्या क्षेत्रामध्ये तसेच **रत्नागिरी, सावंतवाडी, धरणगाव** व **मोर्शी** या ४ नगरपरिषदांमध्ये रिक्त अध्यक्ष पदांच्या पोट निवडणुका असल्यामुळे संपूर्ण नगरपरिषदेच्या क्षेत्रामध्ये व **गडहिंग्लज** नगरपरिषदेच्या हद्दवाढ क्षेत्राची निवडणूक असल्यामुळे या हद्दवाढ क्षेत्रामध्ये तसेच अन्य नगर परिषदा/नगर पंचायतींच्या रिक्त सदस्य पदांची पोटनिवडणूक असलेल्या संबंधित प्रभागात लागू राहील. उपरोक्त क्षेत्रातील मतदारांवर विपरित प्रभाव टाकणारी कोणतीही कृती / घोषणा कोणत्याही मंत्री, खासदार, आमदार, नगरसेवक किंवा इतर पदाधिकाऱ्यांना इतरत्र सुध्दा करता येणार नाही.

९. सार्वत्रिक निवडणूक असलेल्या नगर पंचायतींच्या प्रभाग रचना व सार्वत्रिक तसेच पोट निवडणूक असलेल्या नगर परिषदा / नगर पंचायतींच्या मतदार यादीसंदर्भात न्यायालयात याचिका दाखल झाल्या असल्यास याबाबतची खातरजमा करुन न्यायालयाच्या आदेशानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील. तसेच कोणत्याही रिट याचिकेमध्ये मा.न्यायालयाचे स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास निवडणूक कार्यक्रम तात्काळ रद्द / स्थगित करुन तसे आयोगास अवगत करावे.

१०. राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भाधीन दिनांक ०७/०५/२०१९ व दि. २२/०७/२०१९ रोजीच्या व इतर पत्रातील सूचनांनुसार काटेकोरपणे कार्यवाही करण्यात यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

सहपत्र- परिशिष्ट-१, २ व ३

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-
१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
३) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
४) मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५) प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
६) पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
८) विभागीय आयुक्त, (सर्व)
९) संबंधित जिल्हा पोलिस अधिक्षक
१०) संबंधित नगर परिषदा व नगर पंचायतींचे प्रशासक व मुख्याधिकारी
११) संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई- ४०० ००४.
१२) राज्य निवडणूक आयोगाच्या पॅनलवरील सर्व वकील
१३) प्रभारी उपायुक्त, संगणक कक्ष, राज्य निवडणूक आयोग, मुबंई.
१४) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१५) राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील सर्व कार्यासने
१६) निवड नस्ती (का.६), राज्य निवडणूक आयोग, मुंबई.

## परिशिष्ट -१ (सार्वत्रिक/पोट निवडणुकांसाठी)

**(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.६/का.६, दि.२९/११/२०१९ सोबतचे सहपत्र.)**

(i) नवनिर्मित **चंदगड, हातकणंगले व ढाणकी** या ३ नगरपंचायतींच्या अध्यक्ष व सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुका-२०१९

(ii) **गडहिंग्लज** नगरपरिषदेच्या हद्दवाढ क्षेत्राकरिता निवडणूक-२०१९

(iii) नगर परिषदा/नगरपंचायतींमधील सोबतच्या **परिशिष्ट-३** मधील नमूद २१ रिक्त सदस्य पदांच्या व **रत्नागिरी, सावंतवाडी, धरणगाव व मोर्शी** या ४ नगरपरिषदांमधील रिक्त अध्यक्ष पदांच्या पोट निवडणुका-२०१९

| अ.क्र. | निवडणूकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची/संपविण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | अंतिम प्रभागनिहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करण्यात आल्याचा दिनांक | **२५/११/२०१९ (सोमवार)** |
| २ | जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणूक कार्यक्रम जारी करण्याची तारीख | **०२/१२/२०१९ (सोमवार)** |
| ३ | नामनिर्देशनपत्र राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरीता उपलब्ध असण्याचा कालावधी. | **०४/१२/२०१९ (बुधवार) सकाळी ११.०० ते १२/१२/२०१९ (गुरुवार) दुपारी ०२.०० पर्यंत** |
| ४ | वरील नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा कालावधी | **०४/१२/२०१९ (बुधवार) ते १२/१२/२०१९ (गुरुवार) (सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० पर्यंत) दि.०८/१२/२०१९ रविवार या सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत.** |
| ५ | नामनिर्देशनपत्राची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | **१३/१२/२०१९ (शुक्रवार) सकाळी ११.०० वाजल्यापासुन** |
| ६ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक **अपील नसेल तेथे** | **१८/१२/२०१९ (बुधवार) दुपारी ०३.०० वाजेपर्यंत** |
| ६-अ | **अपील असल्यास**<br>(i) **वैधरित्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून तीन दिवसांच्या आत, जिल्हा न्यायाधिशाकडे अपिल करता येईल.**<br>(ii) **निवडणूक निर्णय अधिकारी यानी अपिलाचा निर्णय लवकरात लवकर प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न करावेत.** | **अपिलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यात येईल त्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी किंवा तत्पूर्वी. मात्र दिनांक २०/१२/२०१९ (शुक्रवार) पर्यंत.** |
| ७ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | **उमेदवारी मागे घेण्यासाठीच्या शेवटच्या दिवसानंतरच्या लगतच्या दिवशी** |
| ८ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | **२९/१२/२०१९ (रविवार) सकाळी ७.३० पासून ते सायंकाळी ५.३० पर्यंत** |
| ९ | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | **३०/१२/२०१९ (सोमवार) सकाळी १०.०० वाजल्यापासून** |
| १० | **महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे** | **कलम १९ मधील तरतुदीनुसार** |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

C:\Users\kesharsing.sulane\Desktop\नांदेड-वाघाळा मनपा.docx

# नगर पंचायतींची नावे

## परिशिष्ट – २ (सार्वत्रिक निवडणुकांसाठी)

**(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.६/का-६, दि.२९/११/२०१९ सोबतचे सहपत्र.)**

| अ.क्र. | जिल्हा | नगरपंचायतींचे नाव | नगर पंचायती नव्याने स्थापन झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | कोल्हापूर | चंदगड (नवनिर्मित) | ०२/०१/२०१९ |
| | | हातकणंगले (नवनिर्मित) | ०५/०३/२०१९ |
| २ | यवतमाळ | ढाणकी (नवनिर्मित) | ०२/०३/२०१९ |
| | एकूण | ३ | |

# नगर परिषदा / नगर पंचायतींची नावे

## परिशिष्ट - ३ (हद्दवाढक्षेत्राची व रिक्त अध्यक्ष/सदस्य पदांच्या पोट निवडणुकांसाठी)

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.६/का-६, दि.२९/११/२०१९ सोबतचे सहपत्र.)

| अ.क्र. | जिल्हा | नगर परिषदेचे नाव (हद्दवाढक्षेत्राची निवडणूक) | नगरपरिषदेची हद्दवाढ झाल्याचा दिनांक | न.प./न.पं. च्या रिक्त अध्यक्ष व सदस्य पदांची पोट निवडणूक असलेले प्रभाग व जागा क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | रत्नागिरी | -- | -- | रत्नागिरी - अध्यक्ष |
| २ | सिंधुदुर्ग | -- | -- | सावंतवाडी - अध्यक्ष |
| ३ | सातारा | -- | -- | मलकापूर - ७- ब |
| | | -- | -- | वाई - ८-अ |
| ४ | सांगली | -- | -- | खानापूर - ७ |
| ५ | सोलापूर | -- | -- | बार्शी - ५- अ |
| ६ | कोल्हापूर | गडहिंग्लज | ०८/०३/२०१९ | -- |
| ७ | नाशिक | -- | -- | मनमाड - १-ब |
| ८ | जळगाव | -- | -- | धरणगाव - अध्यक्ष |
| | | -- | -- | भुसावळ - ४-अ |
| | | -- | | भडगाव - ३- ड |
| ९ | नंदुरबार | -- | -- | नवापूर - ६- अ |
| | | -- | -- | नवापूर - ७-अ |
| १० | उस्मानाबाद | -- | -- | परंडा - ७-ब |
| | | -- | -- | कळंब - ८-ब |
| ११ | अमरावती | -- | -- | मोर्शी - अध्यक्ष |
| १२ | नागपूर | -- | -- | उमरेड - ११-अ |
| | | -- | -- | भिवापूर - ४ |
| १३ | वर्धा | -- | -- | सिंदी (रेल्वे) - ८-क |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४ | भंडारा | -- | -- | मोहाडी- ४ |
| | | -- | -- | मोहाडी - ९ |
| | | -- | -- | मोहाडी - १२ |
| | | -- | -- | साकोली - ६ - ब |
| १५ | चंद्रपूर | -- | -- | कोरपना - १६ |
| १६ | गडचिरोली | -- | -- | भामरागड - ५ |
| | | -- | -- | भामरागड - १६ |
| | एकूण | १ | | २५ |